# मुंबई विद्यापीठ

REG/ICC/2019-20/30

## परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १५/०३/२०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२०/प्र.क्र. ६०/२०/ताशि–१ दि. १६/०३/२०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२०/ प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दिनांक १८/०३/२०२०

५) संकिर्ण–२०२०/ प्र.क्र. ६०/२०/ता.शि.–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९/०३/२०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

उपरोक्त संदर्भांकिंत पत्राच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता संदर्भाधिन परिपत्रक क्र. १ ते ५ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केले आहेत व उपरोक्त परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले आहे.

सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय (उच्चतर शिक्षा विभाग, उच्च शिक्षण विभाग), भारत सरकार, नवी दिल्ली यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ६ अन्वये प्राप्त निर्देशानुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी व देशभरातील शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक/संशोधक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना अंकित केल्या आहेत.

उपरोक्त संदर्भाधिन पत्र क्र. ६ च्या अनुषंगाने राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियत्रंणाखाली येणा—या सर्व शैक्षणिक संस्थांनी दिनांक २३ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० चे दरम्यान शिक्षक/संशोधक/ व शिक्षकेत्तर कर्मचा—यांनी यांना आपले घरी राहून (Work from Home ) संबंधित विभागाचे कामकाज करावे असे ही नमुद केले आहे. तद्वतच, शिक्षक व संशोधकांनी हा काळ online content विकसित करणे, online अध्यापन, online मुल्यमापनाकरिता उपयोगात आणावा त्याचप्रमाणे **पुढील सत्र/शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक साहित्य तयार करणे, संशोधन लेख, संशोधन पेपर व संशोधना संदर्भात इतर आवश्यक कार्यवाही करावी असेही सुचित केले आहे. याशिवाय नाविन्यपूर्ण प्रश्नसंचयनी (Question Bank) व एक भारत ; श्रेष्ठ भारत व इतर महत्वाच्या विषयांवर नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करण्यासंदर्भात कार्यवाही करावी असेही निर्देशित केले आहे.** उपरोक्त कालावधी हा शिक्षक (तद्‌र्थ व कंत्राटी शिक्षक देखिल)/संशोधक/ शिक्षकेत्तर कर्मचा—यांकरिता कर्तव्य कालावधी (On Duty) म्हणून ग्राहय धरण्यात येईल असे सुचित केले आहे. संबंधित सर्व संस्थांमधील वसतिगृहात अद्यापही वास्तव्याला असलेल्या विद्यार्थ्यांना, विशेषत्वाने विदेशी विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्येच वास्तव्य करण्याची अनुमती देण्यात यावी व कोरोना विषाणूच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता प्रतिबंधात्मक उपायां संदर्भात आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याबाबत सल्ला देण्यात यावा. आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित संस्था प्रमुखांकडे सादर करावा असे देखिल निर्देशित केले आहे.

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य व संचालक, मान्यता प्राप्त संस्था यांना कळविण्यात येते की उद्‌भवलेल्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवून संबंधित सर्व महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थांचे सर्व कामकाज घरी राहून (work from Home) च्या माध्यमातूनच होईल या संदर्भात त्यांनी संबंधित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाशी चर्चा करुन आवश्यक कार्यवाही करावी. तद्‌वतच संबंधित जिल्ह्यातील मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे संपर्कात राहून त्यांचे निर्देशानुसार कार्यवाही करावी.

मुंबई — (डॉ. अजय देशमुख)

२२ मार्च, २०२० — कुलसचिव

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही करीता :—

प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये/संचालक, मान्यता प्राप्त संस्था